सत्यमेव जयते

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/ २६३३३३३०/२६३३३३३९ Website:- www.barti.in E-mail: - dg@barti.in

## बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षेच्या नि:शुल्क पूर्व प्रशिक्षणाकरीता महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या युवक-युवतींना बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांच्या पूर्व तयारी करीता खालील नमूद महाराष्ट्रातील विद्यापीठांच्या तसेच विविध शासकीय/ निमशासकीय प्रशिक्षण केंद्रांच्या माध्यमातून प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

| अनु. क्र. | प्रशिक्षण केंद्राचे नाव | एकूण जागा |
|---|---|---|
| १ | सामाजिक न्याय भवन, नाशिक | ७५ |
| २ | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर | ७५ |
| ३ | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर | ७५ |
| ४ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद) | ७५ |
| ५ | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती | ७५ |
| ६ | मुंबई विद्यापीठ, मुंबई | १०० |
| ७ | संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती | ७५ |
| | एकूण | ५५० |

दिनांक ३१/०८/२०२३ रोजी प्रसिद्ध केलेल्या जाहिराती मधील पुढील तीन प्रशिक्षण केंद्राकरिता कमी अर्ज प्राप्त झाल्याने अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

| अनु. क्र. | प्रशिक्षण केंद्राचे नाव | एकूण जागा |
|---|---|---|
| १ | कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव | ७५ |
| २ | श्रीमती नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई (महिलांसाठी) | ७५ |
| ३ | श्रीमती नाथाबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, पुणे (महिलांसाठी) | ७५ |
| | एकूण | २२५ |

**पात्रता :**

१) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.
२) उमेदवाराकडे महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा दाखला व अधिवास असावा.
३) बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांच्या पूर्व तयारी प्रशिक्षणासाठी उमेदवार पदवी उत्तीर्ण असावा.
४) रु. ८ लाखापर्यंत उत्पन्न मर्यादा असलेला उमेदवार प्रशिक्षणासाठी पात्र असतील.

**आरक्षण :**

- ३० % जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात येईल.
- ४ %जागा "दिव्यांग" असलेल्या व्यक्तींसाठी (Person with Disability)
- ५ % जागा अनुसूचित जाती अंतर्गत वंचित जाती मधील (वाल्मिकी व तत्सम जाती-होलार, बेरड, मातंग, मांग, मादगी, ई.) करीता
- एकूण जागांच्या ५% जागा विशेष बाब म्हणून राखीव ठेवण्यात येईल.

**चाळणी परीक्षेचे स्वरूप :**

- बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांच्या धर्तीवर विद्यार्थी निवडी करीता चाळणी परीक्षा घेण्यात येईल.
- चाळणी परीक्षेची तारीख https://barti.in/ या बार्टी संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**प्रशिक्षणाच्या अटी व शर्ती :**

- **ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम दिनांक - १०/१०/२०२३**
- प्रशिक्षण कालावधी -६ महिने
- निवड झालेल्या पात्र विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दरम्यान ७५ टक्के पेक्षा जास्त कालावधी प्रशिक्षणास उपस्थित राहिल्यास विद्यावेतन अदा केले जाईल. वसतीगृहामध्ये प्रवेश मिळाल्यास दरमहा रु.४०००/- एवढे विद्यावेतन अदा करण्यात येईल. तसेच ज्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश उपलब्ध होणार नाही त्यांना विद्यावेतन दरमहा रु. ६०००/- अदा केले जाईल.
- सदर योजनेबाबत/ प्रशिक्षणाबाबत काही वाद अथवा धोरणात्मक पेच/प्रसंग निर्माण झाल्यास याबाबतचे अंतिम सर्व अधिकार मा. महासंचालक, बार्टी व शासनास राहतील.
- उपरोक्त जाहिरातीतील नमूद केलेल्या प्रशिक्षणार्थी संख्या कमी जास्त करण्याचे अधिकार मा. महासंचालक यांना राहतील.
- प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीमध्ये कोणतीही शासकीय/निमशासकीय खाजगी नोकरी अथवा व्यवसाय करता येणार नाही.
- ज्या उमेदवारांनी यापूर्वी बार्टी, पुणे मार्फत (MPSC) महाराष्ट्र लोकसेवा आयोग-राज्यसेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण, UPSC नागरी सेवा स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण आणि बँक (IBPS) रेल्वे, एल.आय.सी. इ. व तत्सम स्पर्धा परीक्षांचे यापूर्वी प्रशिक्षण घेतले असेल त्यांची पुन्हा नव्याने प्रशिक्षणासाठी निवड केली जाणार नाही.

❖ **इच्छुक व पात्र उमेदवारांनी दिनांक २७/०९/२०२३ पासून https://barti.live/barti/ibps/login या लिंकवरुन ऑनलाईन अर्ज सादर करावा.**

Sunil Ware 25/9/23

**महासंचालक,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**